Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क.रा.मं./ऑनलाईन/आय.टी/जी.के./२२८७
पुणे-४११ ००४
दिनांक :- १० जून, २०२४

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे,

**विषय :-** जुलै-ऑगस्ट २०२४ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्यज्ञान (जी.के.) विषयाच्या ऑनलाईन परीक्षेबाबत.

सादर-

पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्ट २०२४ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षा मंगळवार, दिनांक : १६ जुलै, २०२४ ते गुरूवार दिनांक : ८ ऑगस्ट, २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. वेळापत्रकाप्रमाणे माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्यज्ञान (जी.के.) विषयाची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असून ती बुधवार दिनांक : ०७ ऑगस्ट, २०२४ व गुरूवार ,दिनांक: ०८ ऑगस्ट, २०२४ या कालावधीत सकाळच्या सत्रामध्ये आयोजित करण्यात येणार आहे. प्रत्येक सत्र माहिती तंत्रज्ञान(आय.टी.) विषयासाठी २ तास ३० मिनिटे व सामान्यज्ञान (जी.के.) विषयासाठी २ तास या कालावधीचे राहिल.

**सदर परीक्षेच्या पूर्वतयारीबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत -**

संगणक प्रयोगशाळा व संगणक यंत्रणे परीक्षेसाठी सुसज्ज करण्यात यावी.

१. ऑनलाईन परीक्षेसाठी तांत्रिक सहाय्यक (माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्यज्ञान (जी.के.) विषय शिकविणारे शिक्षक) या पदावर परीक्षा काळात काम पाहणाऱ्या व्यक्तींची संपूर्ण माहिती संकलित करावी.
२. पर्यवेक्षणासाठी (माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्यज्ञान (जी.के.) विषय न शिकविणाऱ्या) शिक्षकांची माहिती संकलित करावी.
३. माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्यज्ञान (जी.के.)विषय शिकविला जाणाऱ्या प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयांची ऑनलाईन तपासणी करून घेण्याबाबत सदर कनिष्ठ महाविद्यालयांना कळवावे.
४. विभागीय मंडळात ऑनलाईन परीक्षेचे काम पाहणाऱ्या कर्मचाऱ्याचे नाव, हुद्दा, शाखा, संपर्काचा दूरध्वनी कमांक तसेच नियुक्त केलेल्या समन्वयकांची नावे दूरध्वनी कमांक व क.म.वि.चे नाव इत्यादी माहिती राज्य मंडळास त्वरित कळवावी.
५. या परीक्षेसाठी अखंडित विद्युत पुरवठा, दूरध्वनी सेवा व इंटरनेट कनेक्टिव्हीटी आवश्यक आहे. यादृष्टिने आपण आपल्या कार्यक्षेत्रात विभागीय/जिल्हा स्तरावरील संबंधित यंत्रणांशी

याविषयीच्या सूचना सत्र परीक्षा झाल्यानंतर देण्यात येतील. पुर्नपरीक्षेच्या वेळी विद्यार्थ्याला पूर्वीच्या परीक्षेच्या वेळी सोडविलेली उत्तरे वाचण्याची व वाटल्यास त्यात सुधारणा/बदल करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

१०. परीक्षा कालावधीत परीक्षा सुरू झाल्यानंतर इंटरनेट कनेक्टिव्हीटीमध्ये व्यत्यय आल्यास विद्यार्थ्यांनी गोंधळून न जाता प्रश्नपत्रिका सोडविण्याचे काम सुरू ठेवावे. कनेक्टिव्हीटी उपलब्ध झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी दरम्यानच्या काळात सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे सादर करावी. पेपरची वेळ संपावयाच्या वेळेस कनेक्टिव्हीटी खंडित झाली असेल तर, पेपरची वेळ संपताच विद्यार्थ्यांनी दिलेली उत्तरे आपोआप सादर होतील. सबब, अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी गोंधळून जाण्याचे कारण नाही, असे संबंधितांना सूचित करावे.

११. दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेप्रमाणे जादा वेळेची सवलत मान्य राहिल.
परीक्षेला बसलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांनासाठी परीक्षेचीवेळ माहिती तंत्रज्ञान या विषयासाठी ३ तांस २० मिन्टे असतील व सामान्यज्ञान या विषयासाठी २ तांस ४० मिन्टे असतील.

१२. गणकयंत्र विभागाकडून दिव्यांग विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त झालेली आहे. याव्यतिरिक्त ऐनवेळेस असे विद्यार्थी परीक्षेसाठी आल्यास, त्यांचे बैठक क्रमांक आणि कनिष्ठ महाविद्यालयांचे क्रमांक त्वरित विभागीय तांत्रिक समन्वयकांना कळवावे. जेणेकरून त्यांच्या परीक्षेचे नियोजन करता येणे शक्य होईल. अशा प्रकरणी त्यांच्याकडून आवश्यक ते प्रमाणपत्र प्राप्त करून विभागीय मंडळास सादर करावे व त्यानुसार आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना संबंधितांना द्याव्यात. परीक्षेला बसलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांनासाठी परीक्षेचीवेळ माहिती तंत्रज्ञान या विषयासाठी ३ तांस २० मिन्टे असतील व सामान्यज्ञान या विषयासाठी २ तांस ४० मिन्टे असतील.

१३. जे विद्यार्थी तांत्रिक व्यत्यय व अन्य कारणांमुळे निर्धारित वेळापत्रकानुसार परीक्षा देऊ शकणार नाहीत, त्यांच्यासाठी खास बाब म्हणून सर्व परीक्षा केंद्रांवर दिनांक : ०९ ऑगस्ट, २०२४ रोजी सकाळी ११.०० ते १.३० माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) आणि
सकाळी ११.०० ते १.०० सामान्यज्ञान (जी.के.) या विषयांसाठी पुर्नपरीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ज्या विद्यार्थ्यांची उपरोक्त कारणास्तव परीक्षा होणार नाही, अशा क.म.वि.नी त्या विद्यार्थ्यांची माहिती दिनांक : ०८ ऑगस्ट, २०२४ (माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व (सामान्यज्ञान (जी.के.) या विषयांच्या ऑनलाईन परीक्षांच्या दुसऱ्या सत्रापर्यंत विभागीय मंडळ कार्यालयातील विभागीय तांत्रिक समन्वयकांना कळविणे आवश्यक आहे, अशा सूचना देण्यात याव्यात. दिनांक : ०९ ऑगस्ट, २०२४ माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्यज्ञान (जी.के.) रोजी होणाऱ्या पुर्नपरीक्षेसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारण्यात येऊ नये.

१४. सर्वसाधारण परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना ज्या कारणासाठी गैरमार्गाचा अवलंब करण्याबद्दल शिक्षा बजावली जाते, ती कारणे व शिक्षेची तरतूद ऑनलाईन परीक्षेसाठीही लागू राहिल. लेखी परीक्षेप्रमाणेच विद्यार्थ्यांना कोणतेही अतिरिक्त साहित्य तसेच मोबाईल, पेजर, कॅलक्युलेटर इत्यादी तत्सम इलेक्ट्रॉनिक साहित्य/वस्तू परीक्षेच्या वेळी जवळ बाळगता येणार नाही, अशा स्पष्ट सूचना त्यांना देण्यात याव्यात.

१५. माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) या विषयाच्या गुण याद्या गणकयंत्र विभागाकडे पाठवितांना विभागीय मंडळांनी विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे परीक्षण झाले असून त्यांच्या गुण याद्या पाठविण्यात येत आहेत, अशा अर्थाचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

१६. या परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर या विषयासाठीचे (लेखी परीक्षेव्यतिरिक्त) गुण पडताळणीचे अर्ज प्राप्त झाल्यास त्यांची माहिती (विद्यार्थ्याचा बैठक क्रमांक, नाव, कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांक, विषयात मिळालेले गुण) त्वरित राज्य मंडळास सादर करण्यात यावी. या विषयाची गुण पडताळणी राज्य मंडळ स्तरावर केली जाईल व गुण पडताळणीचा निकाल विभागीय मंडळांना कळविला जाईल. विभागीय मंडळानी सदरचा निकाल प्रचलित पध्दतीने संबंधितांना कळवावा.

संपर्क साधून त्यांच्या अखंडित विद्युत पुरवठा उपलब्धतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

६. परीक्षा कालावधीसाठी तसेच, परीक्षापूर्व नियोजनाकरिता राज्य/विभागीय/जिल्हा समन्वयकांची खालीलप्रमाणे नेमणूक करावी. परीक्षापूर्व कामाकरिता दिनांक : ०१ जुलै, २०२४ पासून विभागीय समन्वयक कार्यरत असतील याची खबरदारी घ्यावी. तसेच, परीक्षा पूर्ण झाल्यानंतर राज्य मंडळ कार्यालयातील ऑनलाईन समन्वयकांच्या सूचनेप्रमाणे विभागीय समन्वयकांना कार्यमुक्त करावे व त्यापूर्वी परीक्षेच्या कामाचा दैनंदिन अहवाल त्यांच्याकडून लेखी स्वरूपात घ्यावा.

खालीलप्रमाणे विभागीय व जिल्हा समन्वयकांची नेमणूक करावी –

| अ. क्र. | विभागीय मंडळाचे नाव | राज्य समन्वयक | विभागीय समन्वयक | जिल्हा समन्वयक |
|---|---|---|---|---|
| ०१. | | राज्य समन्वयक हे राज्य मंडळातील प्रत्यक्ष कामाचे दिवस वगळून उर्वरित कालावधीत विभागीय समन्वयक म्हणून काम पाहतील. | प्रत्येक विभागीय मंडळासाठी विभागीय समन्वयकांची नेमणूक खालीलप्रमाणे करावी– (१) ०१ ते १५० क.म.वि.साठी एक समन्वयक (२) १५१ ते ३०० क.म.वि.साठी दोन समन्वयक (३) ३०१ पासून पुढे तीन समन्वयक (उपरोक्त संख्येतून त्या विभागातील राज्य समन्वयकांची संख्या वगळून नेमणूक करावी.) | प्रत्येक विभागीय मंडळासाठी जिल्हा समन्वयकांची नेमणूक खालीलप्रमाणे – (१) जिल्हयातील ०१ ते ३० क.म.वि.साठी एक समन्वयक (२) ३१ ते ५० क.म.वि. साठी दोन समन्वयक (३) ५१ व त्यापुढील क.म.वि. साठी तीन समन्वयक |
| ०२. | पुणे | ०१ | | |
| ०३. | नागपूर | ०० | | |
| ०४. | छ.संभाजीनगर | ०० | | |
| ०५. | मुंबई | ०१ | | |
| ०६. | कोल्हापूर | ०० | | |
| ०७. | अमरावती | ०० | | |
| ०८. | नाशिक | ०० | | |
| ०९. | लातूर | ०० | | |
| १०. | कोकण | ०० | | |

७. विभागीय समन्वयकांच्या सहाय्याने नव्याने मान्यता दिलेल्या तसेच, मागील परीक्षांमध्ये ज्या महाविद्यालयांना अडचणी आल्या होत्या, त्या कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी देऊन तपासणी करावी व सदर कनिष्ठ महाविद्यालय परीक्षेकरिता सुयोग्य राहतील, याची काळजी घ्यावी. तपासणी अहवाल राज्य मंडळास त्वरित सादर करावा.

८. सदर परीक्षा ज्या ठिकाणी माहिती तंत्रज्ञान विषय शिकविण्यास मान्यता दिलेली आहे अशा सर्व कनिष्ठ महाविद्यालयांतच घेण्यात येईल. (माहिती तंत्रज्ञान विषय घेतलेल्या नियमित परीक्षार्थ्यांसाठी फक्त माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्यज्ञान (जी.के.) विषयासाठी त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय हेच परीक्षा केंद्र राहिल.) या विषयासाठी विद्यार्थी त्यांच्या लेखी परीक्षा केंद्रावर (प्रसंगानुरूप) न जाता कनिष्ठ महाविद्यालयात जातील. याबाबतच्या सूचना संबंधितांना देण्यात येतील.

९. परीक्षा कालावधी २.३० तासांचा आहे. यापूर्वी घेतलेल्या या विषयाच्या सर्व सराव परीक्षांचा अनुभव, प्रश्नपत्रिका आराखडयाचे स्वरूप पाहता, सर्वसाधारणपणे १.४५ तास ते २ तास कालावधी प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी पुरेसा असल्याचे आढळून आले आहे. मात्र, परीक्षेचे तांत्रिक स्वरूप पाहता, संभाव्य तांत्रिक व्यत्ययाचा विचार करून परीक्षेचा कालावधी २.३० तास ठेवण्यात आला आहे. त्यामुळे विद्युत पुरवठा अर्ध्या तासापर्यंतच्या कालावधीसाठी खंडित झाला असल्यास परीक्षेचे पुर्ननियोजन करण्याची आवश्यकता राहणार नाही. यापेक्षा जास्त कालावधीसाठी विद्युत पुरवठा खंडित झाला असल्यास परीक्षेचे पुर्ननियोजन करण्यात येईल,

१७. या विषयासाठी नोंदविलेल्या विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक गणकयंत्र विभागामार्फत संगणक प्रयोगशाळेत उपलब्ध झालेले आहेत. या व्यतिरिक्त एखाद्या विद्यार्थ्याने नव्यानेच हा विषय घेतला असल्यास अथवा यापूर्वी हा विषय घेतला होता, परंतु ऐनवेळी तो वगळला असल्यास त्याची माहिती तसेच, हा विषय घेतलेल्या एखाद्या विद्यार्थ्यास अपात्र ठरविले असल्यास (नो कॅन्डीडेट) त्याची सविस्तर माहिती तात्काळ ई-मेलद्वारे राज्य मंडळास दिनांक : १८ जुलै, २०२४ पर्यंत कळवावी.

१८. जो विद्यार्थी नियोजित सत्रामध्ये परीक्षेस उपस्थित राहू शकणार नाही व पुढील सत्रासाठी उपस्थित राहण्याबाबत इच्छा व्यक्त करेल, त्या विद्यार्थ्याचा बैठक क्रमांक, मूळ बॅच क्रमांक व तो कोणत्या सत्रामध्ये प्रविष्ठ होऊ इच्छित आहे, त्याची माहिती ज्या परीक्षा सत्रात तो हजर राहणार आहे ते परीक्षा सत्र सुरू होण्यापूर्वी किमान एक तास विभागीय तांत्रिक समन्वयक यांना संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाने कळविणे आवश्यक आहे. अन्यथा, त्या विद्यार्थ्याची परीक्षा त्या सत्रात होऊ शकणार नाही.

१९. उत्तरपत्रिका तपासण्यासाठी आवश्यक संगणक प्रणाली, प्रश्नसंच, नमुना उत्तरे व विद्यार्थ्यांनी दिलेली उत्तरे संबंधित विभागीय मंडळांना उपलब्ध करून देण्यात येईल. त्या आधारे परीक्षकांनी परीक्षण व नियामकांनी नियमन करावयाचे आहे.

२०. उत्तरपत्रिका तपासण्याचे काम फक्त **मुंबई** विभागीय मंडळामार्फत होणार आहे. उत्तरपत्रिका तपासण्याचा कार्यक्रम स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

तांत्रिक सहाय्यकांनी परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रांवर उपलब्ध असले तरी त्यांनी विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची मदत करावयाची नसून प्रयोगशाळेत पर्यवेक्षकांनी बोलाविल्याशिवाय जावयाचे नसल्याबाबत त्यांना स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

सदर ऑनलाईन परीक्षेचे गोपनीय साहित्य ऑनलाईन स्वरुपात दिले जाईल.

संबंधित व्यक्तिंना द्यावयाचे मानधन दराचे दि.१३/१२/२०१९ रोजीच्या कार्यकारी परिषदेच्या ठरावानुसार निश्चित केलेल्या सुधारित दरानुसार सर्व संबंधित घटकांच्या नियुक्तीबाबत तसेच, मानधनाबाबत कार्यवाही करण्यात यावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४

क्र.कोविमं/उमा/प्रात्य/ऑनलाईन/ 844
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक- १२/०६/२०२४

- उपरोक्तप्रमाणे जूलै-ऑगस्ट २०२४ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी ) "माहिती तंत्रज्ञान" (आय.टी.) व "सामान्यज्ञान" (जी.के.) विषयाच्या ऑनलाईन परीक्षेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापर.